REGISTERED No. B 3434.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख ३ सप्टेंबर १९४७ | अंक ३६

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)**

पुणें शाखा:-९७४ सदाशिव, लक्ष्मीरोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.—

ब्रँच सेक्रेटरी

**आरको**

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू


आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें




**धूतपापेश्वर औषधें**




पुणें डेपो—सिटी पोस्टासमोर, : नागपूर—महाल रोड,

कोल्हापूर—महाद्वार रोड.

# विविध माहिती

**चीनमधील अमेरिकन खलाशी**–टीन्स्टीन, ह्या चीनमधील शहरांत सध्या असलेले अमेरिकन नाविक दलांतील खलाशी लवकरच काढून घेतले जाणार आहेत. चीनमध्यें अमेरिकन नाविक दलांतील खलाशी दोन वर्षेपर्यंत होते. त्यांच्यापैकी मुख्य पथकें गेल्या जूनमध्यें चीनमधून बाहेर पडलीं. आतां बाहेर जाणारे खलाशी पॅसिफिक महासागरांतील अमेरिकेच्या ताब्यांतील बेटांवर रुजू होतील.

**हिशेबतपासनीसांच्या परीक्षा**–ऑडिटर्स सर्टिफिकेट रूल्सप्रमाणें घेण्यांत येणारी हिशेबतपासनीसांची पहिली व दुसरी परीक्षा डिसेंबर १९४७ मध्यें घेण्यांत येणार आहे. परीक्षाकेंद्रें मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली, कराची आणि लाहोर हीं असून परीक्षेला बसण्याचा अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० सप्टेंबर १९४७ ही आहे.

**अमेरिकेंत छोट्या इंग्लिश मोटारी**–इंग्लंडमधील ऑस्टिन मोटार कंपनीचे अध्यक्ष 'बेबी ऑस्टिन' मोटारगाडीचे नवीन नमुने बरोबर घेऊन अमेरिकेला गेले आहेत. ब्रिटिश सरकारनें मोटारीच्या उत्पादनापैकीं ७५ टक्के उत्पादन निर्यात करण्याची सूचना मोटारच्या कारखानदारांना दिली आहे. ह्या सूचनेस अनुसरून अमेरिकेंत इंग्लिश मोटारी खपविण्यासाठीं वरील कंपनीचे अध्यक्ष अमेरिकेंत गेले आहेत.

**अमेरिकन कारखानदार आणि कामगार**—फोर्ड व इतर अमेरिकन मोटार कारखानदारांनीं कामगारांच्या संघांशीं 'युनिअन शॉप' अंमलांत आणण्याचे करार केले आहेत. ह्या करारान्वयें कारखान्यांत कामावर रुजू झाल्यापासुन ३० दिवसांच्या आंत प्रत्येक कामगारानें योग्य त्या ट्रेड युनिअनचे सभासद झालेंच पाहिजे, अशी अट उभयपक्षीं मान्य करण्यांत आली आहे.

**क्रमिक पुस्तकांसाठी कागद**—शाळा-कॉलेजांतून शिकविण्यांत येणाऱ्या क्रमिक पुस्तकांसाठी पुरेसा कागद मिळण्याची अडचण लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें छापखान्यांना आणि प्रकाशकांना ह्या कामासाठी ऑगस्ट ते डिसेंबरपर्यंत कांहीं थोडा कागद देण्याचें ठरविलें आहे. मात्र हीं क्रमिक पुस्तकें प्रांतिक सरकार, संस्थानी सरकार अगर विद्यापीठें ह्यांनीं मंजूर केलेलीं असलीं पाहिजेत.

**मद्रास प्रांतासाठी धान्य**—मद्रास प्रांतांतील अन्नधान्याच्या टंचाईचें अंशतः निवारण करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें ५,००० टन तांदूळ देण्याचें कबूल केलें आहे. मद्रास प्रांतांत सध्या डाळींचाही तुटवडा असून डाळीसाठीं मद्रास सरकारनें संयुक्त-प्रांत व हैद्राबाद संस्थान ह्यांच्याकडे विचारणा केली आहे.

**मद्रास प्रांतांतील सर्वांत मोठें धरण**—मद्रास प्रांताच्या युद्धोत्तर पाटबंधाऱ्याच्या कार्यक्रमांत रामपदसागर येथील धरण हें सर्वांत मोठें आहे. ह्या धरणाच्या बांधकामाला १९४८ च्या अखेरीस प्रारंभ होणार असून त्यासाठी ८० कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. काम पूर्ण होण्यास २० वर्षांचा अवधी लागेल.

**चीनमध्यें नाझी पुढारी**—अमेरिकेच्या परराष्ट्रखात्यानें असें जाहीर केलें आहे कीं नाझी पक्षांतील बरेच प्रमुख सभासद चीनमध्यें फरारी झाले आहेत. अतिपूर्वेकडील देशांतुन नाझी सत्तेचें पुनरुत्थापन होण्याचा संभवही परराष्ट्रखात्यानें व्यक्त केला आहे.

**कागदाचे हिंदी कारखाने**—'वर्ल्ड प्रेस न्यूज' ह्या ब्रिटिश अर्थशास्त्रीय नियतकालिकांत एका ब्रिटिश तज्ञानें हिंदुस्थानांतील जंगलांचा उपयोग करून दोन्ही वसाहतींत वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाच्या गिरण्या काढाव्या असें सुचविलें आहे.

**पाकिस्तानांतून कापसाची निर्यात**—पाकिस्तान सरकारनें हंगामी धोरण म्हणून नोव्हेंबर १९४७ अखेरपर्यंत कापसाच्या निर्यातीला खुली परवानगी दिली आहे. कापसाच्या कमींत कमी आणि जास्तींत जास्त किंमतींही लवकरच जाहीर करण्यांत येतील. 'हेज' कॉंट्रॅक्टसूचीही परवानगी देण्यांत आली आहे.

**ब्रिटनमध्यें आळशीचें उत्पादन**—हिंदुस्थानला अन्नधान्याच्या बदली आळशीची जरूर असल्यामुळें आणि अर्जेंटाय्नांतील आळशीच्या किंमती जबर असल्यामुळें ब्रिटननें आळशीचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर करण्याचें ठरविलें आहे. ब्रिटनच्या शेतीच्या नव्या कार्यक्रमांत ४०,००० एकर जमीन आळशीसाठीं वापरण्यांत येणार आहे.

**ब्रिटनची आर्थिक दुरवस्था**—ब्रिटन फक्त अमेरिकेवर अवलंबून राहिल्यानें आणि अमेरिकेंतील किंमतींच्या झपाट्याच्या वाढीमुळें ब्रिटनचें अमेरिकन कर्ज जवळजवळ संपुष्टांत आलें अशी टीका मास्को रेडिओवरून एका निवेदकानें केली. इंग्लंड-अमेरिकेच्या सहकार्याच्या परिणामावरून पश्चिम युरोपांतील इतर राष्ट्रांनीं बोध घेण्यासारखा आहे, असा इषारा त्यानें दिला.

**इटलीची कर्जाची मागणी**—इटलीच्या मंत्रिमंडळानें एक्सपोर्ट अँन्ड इंपोर्ट बँकेकडे २॥ कोटी पौंड कर्जाची नवी मागणी केली आहे. ह्याशिवाय इंटरनॅशनल बँकेकडेही ६ कोटी, २५ लाख पौंडांचें कर्ज देण्याची विनंति करण्यांत आली आहे.

**नवी भांडवल उभारणी**—४ ऑगस्ट १९४७ ला संपणाऱ्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारनें १,९७,५०,०००, रुपये नव्या भांडवल उभारणीची परवानगी दिली. ह्या रकमेंत ६ कंपन्यांचा समावेश आहे. पैकीं १ कोटी रुपयांचें भांडवल कागदाच्या कारखान्यांसाठी आणि २५ लाख रुपयांचें ज्यूट, लाख, चहा, इत्यादींच्या कंपन्यांसाठी मंजूर करण्यांत आलें आहे.

**पाकिस्तानांतील भांडवल नियंत्रण**—१९४७ चा हिंदुस्थान सरकारचा भांडवल-नियंत्रण विषयक कायदा पाकिस्तान वसाहतींलाही लागू आहे असें पाकिस्तान सरकारच्या अर्थखात्यातर्फे जाहीर करण्यांत आलें आहे.

**बंगाली शिक्षणाचें माध्यम**—आर्टस्, सायन्स आणि वैद्यक ह्या विषयांच्या प्रगत अभ्यासक्रमांत शिक्षणाचें माध्यम बंगाली भाषा ठेवण्याचा विचार कलकत्ता विद्यापीठ करीत आहे असें समजतें. शास्त्रीय इंग्लिश शब्दांना बंगाली परिभाषा व शब्द तयार करण्यासाठीं त्वरा करण्याचें परिभाषा समित्यांना सुचविण्यांत आलें आहे.

**परदेशांतून धान्याची आयात**—गेल्या आठवड्यांत मुंबई बंदरांत अन्नधान्य घेऊन दोन बोटी आल्या. पैकीं एक अमेरिकन असून तींत ६,३७५ हजार टन गहूं मध्यप्रांत, द. हैद्राबाद व बडोदा ह्यांच्यासाठीं आला आहे. दुसरी बोट आफ्रिकेची असून तींत ४,०९२ टन गहूं मुंबईसाठीं आणलेला आहे.

**पश्चिम बंगालची पूर्व बंगालला मदत**—चितगांव आणि नोआखली मधील पुरानें त्रस्त झालेल्या भागांसाठीं पश्चिम बंगालनें १५ हजार मण तांदूळ पाठविला. ह्याशिवाय आणखी ५ हजार मण तांदूळ पूर्व-बंगालला धाडण्याचाही हुकूम झाला आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ३ सप्टेंबर, १९४७

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.




प्रो. वा. गो. काळे

## इंडोनेशियांतील वादाची आर्थिक पार्श्वभूमि

### "पुनर्घटना लांबली तरी चालेल, परंतु परराष्ट्रीय भांडवलाची पकड नको."

जुलै महिन्याच्या अखेरीस डच लष्करानें इंडोनेशिया विरुद्ध चढाईस प्रारंभ केला, तिचा उद्देश शांतता रक्षण करणें आणि उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या वाढीस अनुकूल परिस्थिति निर्माण करणें हा असल्याचें सांगण्यांत आलें. नेदरलंड साम्राज्य सरकार व इंडोनेशियाचें रिपब्लिक ह्यांचेमध्यें नेदरलंडस-इंडोनेशियन युनियन बाबत एक करार त्यापूर्वीच झालेला आहे. त्याचे अन्वयें, हॉलंडच्या राजाचे प्रमुखत्वाखाली, डच वेस्ट इंडिज व इंडोनिशिया ह्यांनीं एकत्र यावें असें ठरलें आहे. इंडोनेशियाचें स्वातंत्र्य प्रेसिडेंट सोकर्नो ह्यांनीं १७ ऑगस्ट, १९४५ रोजीं जाहीर केलें होतें, तर ईस्ट इंडोनेशियाची घोषणा डिसेंबर १९४६ मध्यें लेफ्टेनंट गव्हर्नर जनरल, डॉ. व्हॅनमुक, ह्यांनीं केली होती. नेदरलंडस-इंडोनेशियन कराराप्रमाणें जावा, सुमात्रा, वगैरेवर इंडोनेशियाची प्रत्यक्ष सत्ता रहावयाची होती आणि "युनायटेड स्टेट्स् ऑफ इंडोनेशिया" १ जानेवारी १९४९ रोजीं कायदेशीरपणें स्थापन होणार होतें. तोपर्यंत व्यवस्था काय असावी ह्याबद्दल नेदरलंडस व इंडोनेशिया ह्यांचेमध्यें वाटाघाटी चालू होत्या. परंतु डच सरकार थांबण्यास तयार नाहीं; डच कमिशनर जनरलनें इंडोनेशियास हुकूम सोडण्यास प्रारंभ केला आणि आर्थिक प्रश्नांवर उभय सरकारांत मतभेद उत्पन्न झाले.

युद्धापूर्वी, नेदरलंडस ईस्ट इंडीज बेटांवर डचांची पूर्ण सत्ता होती. तेथील वरिष्ठ नोकरवर्ग त्यांचा होता, ह्यांत नवल नाहींच. परंतु बेटां–बेटांतील वहातुक आणि निर्गत व्यापार हाहि सर्वस्वी त्यांचे हातीं होता. ही भांडवलशाही साम्राज्याची घडी आतां विस्कळित झाली. लोकसत्ताक इंडोनेशिया डचांनीं आजवर चालविलेला रक्तशोष ह्यापुढें चालू देणार नाहीं, हें उघड आहे. डचांची इंडोनेशियावरील आर्थिक पकड सुटली तर त्याचें रहाणीचें मान ३० तें ३५ टक्के तरी निश्चितपणें खाली येईल, असें 'एकॉनॉमिस्ट' चा बातमीदार म्हणतो. तेथील रबराच्या किंमती आजच्या भांडवलशाही समाजरचनेंत न्यूयॉर्क, लंडन व ॲम्स्टरडॅम येथील भांडवलदार ठरवितात परंतु स्थानिक मजुरांस पुरेशी मजुरी मिळत नाहीं आणि निर्गत व्यापारांतील नफ्यांत हिस्साहि मिळूं शकत नाहीं. डचांच्या चढाईचें कारण वर सांगितल्याप्रमाणें आर्थिक स्वरूपाचें असलें, तरी बाह्यात्कारी त्याचें स्वरूप राजकीयच आहे. तात्पुरतें संयुक्त सरकार लोकसत्ताक इंडोनेशियाचे आर्थिक हितसंबंध शाबूत राखणार असेल तरच त्यास तें हवें आहे; उलट, डचांना जुनी घडी चालू ठेवण्यासाठी नवा देखावा निर्माण करावयाचा आहे. जावा व सुमात्रा येथील माल जगाचे बाजारांत आणण्याची डच सरकारची घाई आहे आणि अमेरिकाहि आपलें डॉलरचें गिरमीट तेथें उपयोगांत आणूं लागली आहे. तात्पुरतें संयुक्त सरकार स्थापन केलें तर अमेरिकन कर्ज मिळेल असें सांगण्यांत येत आहे, परंतु इंडोनेशियाच्या लोकसत्ताक सरकारास कर्जाची घाई आहे कोठें? परराष्ट्रीय आर्थिक पकडीच्या दुष्परिणामांची त्यास पूर्ण जाणीव असल्याकारणानें, आर्थिक पुनर्घटना लांबणीवर पडली तरी चालेल परंतु स्वातंत्र्यास धोका येऊं नये, अशी त्याची भूमिका आहे. लहान राष्ट्रांकडून कर्जे घेण्यास इंडोनेशिया तयार आहे, परंतु अमेरिकेसारखा मोठा भांडवलशाही सावकार त्यास नको आहे. अतिपूर्वेकडील साम्राज्याचें विसर्जन झालें, तर डचांची पूर्वीची श्रीमंती त्यांना पुनः लाभणें शक्य नाहीं. म्हणून कांहीं झालें तरी इंडोनेशियावरील आपली पकड सैल करण्यास हॉलंड तयार नाहीं.

### अमेरिकन भूमिकेचें विशदीकरण

अमेरिकेचे हिंदुस्थानांतील वकील, डॉ. हेन्री एफ. ग्रेडी, ह्यांनीं अमेरिकेच्या कर्जविषयक धोरणाचा मुंबई येथील रोटरी क्लबांत गेल्या आठवड्यांत खुलासा केला, त्याचा येथें उल्लेख करणें युक्त होईल. इतर देशांना भांडवली आर्थिक सहाय करून अमेरिका त्यांचेवर आपली पकड बसवूं पहात आहे, असा पसरलेला समज चुकीचा असल्याचें त्यांनीं ठासून सांगितलें. भांडवलशाही समाजरचनेचें त्यांनीं गुणवर्णन करून त्या रचनेंतील कांहीं दोषहि पण सांगितले. आर्थिक चलती व मंदी ह्यांचें चक्र हा भांडवलशाहीचाच परिणाम असला, तरी अर्थशास्त्रज्ञांना त्याचेवर उपाय सापडला आहे. अर्थात्, त्याचे दुष्परिणाम पूर्णपणें टाळतां आले नाहींत तरी ते कमी करतां येतील, असें ते म्हटले. बँकिंग व चलन ह्यांवर नियंत्रण, मोनोपोलीवर बंधनें, सरकारी कामें मंदीच्या काळांत करून घेण्याची हातोटी, मंदीचे काळांत सरकारी माल खरेदी व सांठवण, ह्या सर्व बाबतींत आंतरराष्ट्रीय सहकार्य, इत्यादि उपायांचा डॉ. ग्रेडी ह्यांनीं उल्लेख केला. देशांतील औद्योगिक व व्यापारी संघटना आणि राष्ट्रीय सरकार ह्यांचेमध्यें धोरणाबाबत सहविचार झाल्यास बरेंच कार्य करतां येतें, ह्याविषयींचा अमेरिकेंतील अनुभव त्यांनीं कथन केला. व्यापक राष्ट्रीय प्रगतीस बाधक होईल असें धोरण व्यक्तिगत कंपन्या फार काळ चालू ठेवूं शकतच नाहींत अशी परिस्थिति आतां निर्माण होत आहे आणि कांहीं हिंदी उद्योगपतींनींहि ही प्रवृत्ति वेळींच ओळखली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. अमेरिका आपलें भांडवल इतर देशांत देण्यास तत्पर आहे, ह्याचा अर्थ ती कोणत्याहि कडक अटी स्वीकारण्यास तयार आहे, असा मात्र नाहीं, हा खुलासा डॉ. ग्रेडी ह्यांनीं केला आहे. योग्य अटींवर आणि हिंदी लोकांच्या हक्कांस बाध येणार नसेल तर परदेशी भांडवल स्वीकारण्यास हरकत नाहीं, असें हिंदी पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं जाहीर केलेलें आहे. जागतिक पुनर्घटनेसाठी अमेरिकेनें युद्ध काळांत आणि त्यानंतर कोटी रुपयांची मदत इतर राष्ट्रांस स्वार्थत्यागपूर्वक केली आहे, त्यांत अमेरिकेचा संकुचित स्वार्थ नसून व्यापक दृष्टीच आहे, हे डॉक्टर साहेबांनीं कळकळीनें सांगितलें आहे. परंतु, इतर अनेकांना त्याबद्दल साशंकता वाटते, त्यास त्यांचा इलाज काय? हिंदुस्थानास त्यांनीं सहकार्याचें आश्वासन दिलें आहे. हें सहकार्य आपल्यास हितकारक होणें न होणें ही गोष्ट सर्वस्वीं आपल्या पात्रतेवर आणि खंबीरपणावर अवलंबून आहे.

## कॉमनवेल्थ विमा कंपनीची प्रगति

### वार्षिक अहवाल आणि मूल्यमापन

पुणें येथील कॉमनवेल्थ विमा कंपनीची १८ वी वार्षिक सभा ता. २१ सप्टेंबर १९४७ रोजीं कंपनीच्या कचेरींत भरणार असून, त्यावेळीं ३१–१२–४६ अखेरचा वार्षिक अहवाल आणि ताळेबंद भागीदारांच्या मंजुरीसाठी मांडण्यांत येणार आहे. त्याच दिवशीं भरणाऱ्या दुसऱ्या सभेंत कंपनीच्या ३१–१२–४६ अखेर करण्यांत आलेल्या पांचव्या मूल्यमापनाचा अहवालही भागीदारांना सादर करण्यांत येणार आहे. अहवालाच्या वर्षी कंपनीनें ४६,९०,००० वर रुपयांचें काम पूर्ण केलें आहे. एकंदर खर्च वजा जातां ११,७८,५३२ रुपये विमानिधीसाठी शिल्लक उरले. ते पूर्वीच्या विमा–निधींत जमा केल्यावर अहवालाच्या वर्ष अखेर कंपनीचा विमानिधी ६८,५०,००० रुपये इतका होतो. विमा कंपनीच्या कारभारांत खर्चाच्या प्रमाणाला विमेदारांच्या हिताच्या दृष्टीनें विशेष महत्त्व असतें. त्या दृष्टीनें खर्च कमी करण्याचा प्रयत्न संचालक मंडळानें यशस्वी रीतीनें केलेला असून १९४२ सालीं रिन्युअल खर्चाचें प्रमाण २२·६ टक्के होतें तें १९४६ अखेर १३·१६ टक्क्यांवर आणण्यांत आलें आहे. तेव्हां यासंबंधीं बोलावयाचें तर कंपनीनें केलेली प्रगति निर्विवाद आहे.

आतां मूल्यमापनाच्या अहवालाचा विचार करतां पुढील मुद्दे प्रामुख्यानें लक्षांत येतात. मूल्यमापनासाठी ओरिएंटल ( १९२५-३५) अल्टिमेट मॉर्टॅलिटी टेबल प्रमाणभूत म्हणून घेण्यांत आलें आहे. व्याजाचा दर ३ टक्के धरण्यांत आला आहे. कंपनीच्या १९४३ सालीं केलेल्या मूल्यमापनाचा आधारभूत पाया ह्याही मूल्यमापनांत गृहीत धरला असता तर विमा पत्रकांच्या आर्थिक जबाबदारीची रक्कम ६५,४०,००० रुपये भरली असती. पण पांचव्या मूल्यमापनाचा हिशेबानें ही ६८,१३,००० रुपये इतकी भरते, ह्यावरून हें लक्षांत येईल कीं २,७३,००० रुपये येवढ्या रकमेची जबाबदारी नव्या मूल्यमापनांत अधिक धरण्यांत आली आहे,आणि ह्या जबाबदारीला तोंड देण्यासाठी म्हणून कंपनीचा विमानिधी ६८,५०,००० हजारापेक्षां थोडा अधिक इतका आहे. अशा रीतीनें पूर्वीच्या (१९४३ च्या) मूल्यमापनापेक्षां ह्या मूल्यमापनाचा प्रमाणभूत पाया विमाशास्त्रानुसार अधिक कांटेकोर धरण्यांत आलेला असून सुद्धां ३७,४२९ रुपये इतका शिल्लक निधी उरलेला आहे. १९४३ च्या मूल्यमापनाचा पाया प्रमाण धरण्यांत आला असता तर सुमारें ३,१०,००० रुपये शिल्लक निधी उरला असता. ह्या रकमेपैकी ३४,६२२ रु. नफ्यासह विमेदारांना वांटतां येण्यासारखे असून २,८०७ रुपये भागीदारांना वाटतां येतील असा अभिप्राय कंपनीच्या विमागणितीनीं व्यक्त केला आहे. तथापि, विमेदारांच्या हक्काची रकम नफ्यासह विमेदारांच्या खास फायद्यासाठी म्हणून बोनस रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत यावी अशी शिफारस करण्यांत आली आहे. १९४१ सालीं विमानिधींतील तूट भरून काढण्यासाठी कंपनीला अधिक भांडवल उभारावें लागलें. आज ही परिस्थिति पूर्णपणें पालटली असून कंपनीच्या विमानिधींत पैचीहि तूट नाहीं. पुढील मूल्यमापन होईपर्यंतच्या दरम्यानच्या काळांत हक्कपूर्तीला लायक होणाऱ्या मुदतीच्या नफ्यासह विमापत्रकावर दरहजारीं रु. २ बोनस जाहीर करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें हयातीनंतरच्या प्रत्येक विमापत्रकावर ते विमापत्रक ३१–१२–४६ नंतर चालूं असलेल्या प्रत्येक वर्षासाठी ५ रुपये बोनस जाहीर करण्यांत आलें आहे. हें बोनस जाहीर करतांना व्याजाचा दर २¾ टक्के पर्यंत खालीं जाण्याचा संभव जमेस धरला आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ह्या मूल्यमापनाच्या वेळीं चालूं असलेल्या परंतु पुढील मूल्यमापनाच्या वेळीं क्लेम होणाऱ्या नफ्यासह विमा-पत्रकांच्या बाबतींत अन्याय होऊं नये म्हणूनच हा दरम्यानचा बोनस जाहीर करण्यांत आला आहे. असें करण्यांत पुढील मूल्यमापनाच्या वेळीं चालू असणाऱ्या नफ्यासह विमापत्रकांनाही अन्याय होत नाहीं. कारण ३१–१२–४६ च्या मूल्यमापनामधील शिल्लक निधीचा त्यांचा वांटा बोनस रिझर्व्ह फंडांत जमा केला असून शिवाय सालोसाल त्यांत पडणाऱ्या शिल्लक निधीचाही त्यांना फायदा मिळेलच.

---

### वृत्तपत्राच्या कागदावरील नियंत्रण

वृत्तपत्रांच्या कागदाबद्दल सल्ला देणाऱ्या कमिटीची बैठक दिल्लीला नुकतीच झाली. वृत्तपत्राच्या कागदाच्या वापराबद्दल सध्या चालू असलेलें नियंत्रण तसेंच पुढें चालू ठेवण्याचा निर्णय कमिटीनें घेतला आहे. हिंदुस्थानांत अजूनही वृत्तपत्रांच्या कागदाची टंचाई असल्यामुळें तो कागद वृत्तपत्रांखेरीज इतर कामासाठी न वापरण्यासंबंधींचीं बंधनें चालू ठेवण्यांत यावीं असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें, कागदाच्या किंमती आणि वृत्तपत्रांच्या पानांची संख्या ह्यावरील नियंत्रणेंही तशींच ठेवण्याची शिफारस कमिटीनें केली आहे. वृत्तपत्रांतील किती जागा जाहिरातींना यावी ह्यासंबंधींचा सध्याचा नियम मात्र सैल करण्यांत यावा असें कमिटीनें सुचविलें आहे. इंग्लंडला कानडांतून मिळणाऱ्या कागदापैकी १,२०,००० टन कागद इंग्लंडला नको आहे. ह्यापैकी ५०,००० टन कागद हिंदुस्थानला मिळवता आला तर पहावा व त्यासाठीं प्रयत्न करावे असें ठरलें. अर्थात् हा कागद हिंदुस्थानला मिळणाऱ्या हिश्याचाच भाग म्हणून मिळण्याचा संभव आहे. हिंदुस्थानाला मिळणारा कागदाचा पुरवठा आणि त्याचा सांठा ह्यासंबंधीं पुढील तक्ता कल्पना देईलः—

| | | महिन्यागणिक आयात: टन | वृत्तपत्रासाठी खप: टन | महिन्या अखेरचा सांठा: टन |
|---|---|---|---|---|
| जानेवारी | १९४७ | ५,३३३ | २,२९४, | १३,२९५ |
| फेब्रुआरी | ,, | ५,४४३ | २,२६७, | १४,९७० |
| मार्च | ,, | ४,०२० | २,७५५ | १७,५९७ |
| एप्रिल | ,, | ३,२७२. | ३,००१ | १७,०१० |
| मे | ,, | ३,६३४ | ३,००३ | १७,७३३, |
| जून | ,, | ३,२८१ | ३,१७० | १७,७२१ |
| जुलै | ,, | ५,९३५ | ३,४५५ | १८,१७८ |
| ऑगस्ट (१ ते १४-८-४७) | ,, | १,४६९ | — | — |

---

### बार्शी सें. को. बँक लि.

( वार्षिक सभाः ६–९–४७ )

गेलीं कांहीं वर्षे बँकेच्या ठेवींमध्यें वाढ व कर्ज, व्यवहारांत घट होत आहे. त्याचा अर्थ, उत्पन्नाची बाब कमी व खर्चाची बाब ज्यास्त, असें घडत आहे. एकूण नफ्याची रकम १९४६–४७ सालीं ३८२ रु. इतकी भरली. तरी त्यापैकी एक चतुर्थांश रकम नियमाप्रमाणें रिझर्व्ह फंडांत टाकून बाकीची तशीच पुढील सालासाठी शिल्लक ठेवावी व डिव्हिडंड ई. फंडांतून २,२५० रु डिव्हिडंड खातीं वर्ग करून दर शेअरला ५ आणे म्हणजे द. सा द. शे. ३·१२ टक्के प्रमाणें डिव्हिडंड यावें अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेचें शेअर भांडवल ७२,२१० रु. असून ९०हजारांवर तिचे रिझर्व्ह व इतर फंड आहेत. काटकसर करून खर्च कमी करणें आणि गुंतवणुकीचे मार्ग शोधून उत्पन्न वाढविणें, ह्या दृष्टीनें चालकांचा प्रयत्न चालू आहे.

## गंभीर हिंदी आर्थिक परिस्थितीचें निदान

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीची वार्षिक सभा नुकतीच झाली. ह्या प्रसंगीं कंपनीचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनीं हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं केलेलें निदान महत्त्वाचें व चिंताजनक आहे, ह्यांत शंका नाहीं.. निरनिराळ्या कंपन्यांच्या उत्पादनाच्या खर्चांत जी वाढ झाली आहे, तिचा निर्देश करतांना श्री. टाटा ह्यांनीं असा अंदाज केला कीं सरकार आणि औद्योगिक व व्यापारी संस्था ह्यांच्या वेतनाच्या व पगाराच्या खर्चाचे आकड्यांत फक्त शहरांतच १०० कोटी रुपयांची वार्षिक वाढ झाली आहे. त्याचबरोबर उत्पादनाची घसरण मात्र जास्तीच झाली आहे. खुद्द कंपनीच्याच उत्पादनाचा विचार करतां, १९४१–४२ सालीं उपयोगास तयार झालेल्या पोलादाचें उत्पादन ८,३९००० टन होतें तें १९४६–४७ सालीं ७,५३,००० टनापर्यंत खालीं घसरलें आहे असें त्यांनीं सांगितले. उत्पादनांत घट होण्याच्या कारणांत मजुरांनीं स्वीकारलेल्या अडवणुकीच्या धोरणाचा त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेख केला. ह्यासंबंधीं बोलतांना श्री. टाटा म्हणाले, "ह्या अडवणुकीवर उपाय म्हणजे सरकारनें बेकायदा संपाबाबत सहानुभूतीचें पण कणखर धोरण स्वीकारलें पाहिजे. आज कारखानदारांची अशी समजूत झालेली आहे कीं सरकार मनांतून त्यांच्या विरुद्ध आहे. कानपूर इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी व तिचे कामगार ह्यांच्या कलहांत ॲडज्युडिकेटरनें जो निर्णय दिला त्यामुळें कारखानदारांना अनिश्चितता वाटूं लागली आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक उत्कर्षासाठीं ज्या नव्या नव्या योजना करणें व अंमलात आणणें जरूर आहे, त्या अशा प्रकारच्या धोरणानें मागें पडतील; आणि त्यामुळें हिंदुस्थानवर लवकरच आर्थिक अरिष्ट ओढवून हिंदी जनतेलाही त्याचे परिणाम भोगावयास लागल्याशिवाय रहाणार नाहींत."

हिंदी पोलादाच्या धंदासंबंधीं श्री. टाटा ह्यांनी कांहीं नवीन माहिती निवेदन केली.-ती अशीः–हिंदुस्थान सरकारनें पोलादाचे दोन मोठे कारखाने उभारण्याचें ठरविलें असून त्यासाठीं तावडतोब तयारीही करण्यांत येत आहे. ह्या प्रत्येक कारखान्याचें उत्पादन ५ लाख 'इनगॉट' येवढें राहील. कारखाने उभारण्यासाठीं मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांचें एक कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशनचें भांडवल ४८ कोटी रुपयांचें होईल. श्री. टाटा ह्यांच्या मतानें पोलादाचा धंदा बराच तांत्रिक आणि अवघड असल्यानें वरील योजना अंमलांत आणणें बरेंच कठीण जाईल. तथापि योजनेचा तपशील अजून बाहेर पडला नसल्यामुळें तूर्त तीवर ते अधिक कांहीं बोलले नाहींत. सध्या पोलादाच्या उत्पादन खर्चांत वाढ झाली आहे. तिची भरपाई करण्यासाठीं किंमतींत वाढ करून देण्यांत आली नाहीं तर नफ्यांत घट होईल व कामगारांच्या नफ्याच्या वांटणीतही कपात होईल असें त्यांनीं सांगितले. चालू सालीं पोलादाचें उत्पादन आणखीच घटलें असून १९४७ च्या पहिल्या चार महिन्यांत उत्पादनाची सरासरी फक्त ५६,२०० टन भरली. देशांतील पोलादाची मागणी लक्षांत घेता, आणि सर्वसामान्य आर्थिक परिस्थितीचा विचार करता, वेतन व किंमती स्थिर करणें आणि चलनविस्ताराला आळा घालणें अत्यंत जरूर आहे असें मत श्री. टाटा ह्यांनीं प्रदर्शित केलें.

## कॅनडा व हिंदुस्थान यांचे संभाव्य व्यापारी संबंध

लेः—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी.

हिंदुस्थान व पाकिस्तान या दोन देशांना आतां आंतरराष्ट्रीय राजकारणांत स्वतंत्र स्थान प्राप्त झालें आहे. या परिस्थितीचा या दोन्ही देशांच्या आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम होतो हें पाहाणें महत्त्वाचें ठरणार आहे. राजकीय स्वातंत्र्यामुळें आपण आर्थिक दृष्ट्या किती प्रमाणांत खरोखर स्वतंत्र होऊं हें आपल्या औद्योगिक वाढीवर, अन्नपरिस्थितीवर व उत्पादनाच्या कार्यक्षमतेवरच अवलंबून राहाणार आहे. आपला परराष्ट्रीय व्यापार परिणामीं आपल्या आर्थिक जीवनाला किती मदत करूं शकतो ही गोष्टहि महत्त्वाची आहे. या दृष्टीनें कॅनडा व हिंदुस्थान यांचे परस्पर आर्थिक संबंध कसे राहाणें संभवनीय दिसतें याबद्दल थोडक्यांत विवेचन येथें करूं.

कॅनडा हा देश स्वतंत्र वसाहत आहे व आतां हिंदुस्थान व पाकिस्तान यांना तोच दर्जा प्राप्त झालेला आहे. कॅनडा दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीपर्यंत विशेषतः कृषिप्रधान देश होता. परंतु युद्ध परिस्थितीचा फायदा घेऊन ऑस्ट्रेलियाप्रमाणेंच कॅनडानें आपले उद्योगधंदे वाढीस लावले व आज निरनिराळ्या तऱ्हेचा पक्का माल तयार करण्याची पात्रता कॅनडाला प्राप्त झाली आहे. हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्या औद्योगिक वाढीला विशेषतः यंत्रसामुग्री, हरतऱ्हेचा भांडवली माल व यांत्रिक तज्ज्ञ यांची विशेष आवश्यकता आहे, व नेमक्या ह्याच गोष्टी योग्य प्रमाणांत पुरविण्यास इंग्लंड किंवा अमेरिका तयार नाहींत किंवा विशिष्ट परिस्थितीमुळें या गोष्टी पुरविण्याच्या बाबतींत अटी किंवा निर्बंध घालीत आहेत. अमेरिकेला आर्थिक क्षेत्रांत विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे, हें 'मार्शल योजना' व अमेरिकेकडून दिलीं जाणारीं परराष्ट्रीय कर्जे या गोष्टींवरून स्पष्ट दिसत आहे. अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वामागें राजकारणाची कांहीं तरी भानगड असावी अशी शंका प्रदर्शित करण्यांत येत आहे.

ही पार्श्वभूमि विचारांत घेतां कॅनडाची परिस्थिति व भूमिका आशाजनक दिसते. देवाण–घेवाण स्वरूपाचा व्यापार हिंदुस्थान व पाकिस्तान यांनीं कॅनडाशीं केल्यास आज जगावर ओढवलेल्या डॉलरच्या तुटवड्याचें अरिष्ट कांहीं प्रमाणांत तरी कमी करावयास किंवा या आपत्तीला तोंड द्यावयास मदत होणार आहे. याशिवाय, कॅनडाला आपली औद्योगिक व आर्थिक परिस्थिति आणखी सुधारावयाची असल्यामुळें हिंदुस्थान व पाकिस्तान सारख्या आतां राजकीय दृष्ट्या समान भूमिकेवर असलेल्या देशांशीं आर्थिक संबंध ठेवणें जास्त सोईस्कर व आपुलकीचें वाटेल. कॅनडाच्या वर्धिष्णु व्यापारी भूमिकेच्या मार्गे राजकारण नाहीं. नेमकी हीच परिस्थिति आजच्या १५ ऑगस्ट नंतरच्या बदललेल्या काळांत हिंदुस्थान व पाकिस्तान यांस फायदेशीर ठरेल.


हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्या औद्योगिक विकासाला परराष्ट्रांतून स्वस्त व्याजाच्या दरानें कर्ज घेण्याची पाळी आल्यास, व या बाबतींत समान दर्जाच्या भूमिकेवरून चर्चा करावयाची झाल्यास कॅनडाची परिस्थिति बरीचशी आशाजनक दिसते. हिंदुस्थानकडून ताग, चहा, लाख इ. स्वरूपाचा कच्चा माल कॅनडाला पाहिजे आहेच व कॅनडाकडून मिळणारी विविध प्रकारची यंत्रसामुग्री हिंदुस्थान, पाकिस्तान यांस पाहिजे आहे. सध्यां यंत्रसामुग्रीची आयात आपण जास्त प्रमाणांत केल्यास व्यापारी देणें वजा जाऊन जी रक्कम उरेल ती तात्पुरतें कर्ज म्हणून देण्यास कॅनडाची तयारी आहे असें कॅनडांतील वृत्तपत्रीय लिखा-

णावरून दिसून येतें. कॅनडाच्या ह्या धोरणाचा शक्य तितका फायदा हिंदुस्थान व पाकिस्तान मधील व्यापारी व भांडवलदार वर्गानें घेणें योग्य दिसतें व या बाबतींत या दोन्ही सरकारांच्या अधिकृत अधिकाऱ्यांनीं एकदिलानें व एकमतानें कॅनडाशीं विचारविनिमय करणें फायद्याचें ठरेल असें वाटतें.

या बाबतींत एक गोष्ट ठरविली जाणें आवश्यक आहे व ती म्हणजे हिंदुस्थान व पाकिस्तान या दोन्ही देशांचें परराष्ट्रीय व्यापाराचें धोरण मुख्य तत्त्वांच्या बाबतींत तरी एकसूत्रीपणाचें राहिलें पाहिजे. असें तें राहील तरच कॅनडाशीं परिणामी आर्थिक दृष्टीनें हितकारक ठरणारे व दोन्ही देशांच्या भावी आर्थिक परिस्थितीला पोषक असे व्यापारी हितसंबंध निर्माण होऊं शकतील. व्यापाराच्या बाबतींत बोलणीं करावयाचीं तींहि अल्प मुदतीच्या कराराच्या स्वरूपाचींच असणें आवश्यक आहे. अमेरिकेनें पुरस्कारिलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेच्या कल्पनेपासून आज आपला फायदा होईल असें दिसत नाहीं व डॉलर्सचा जागतिक तुटवडा, ग्रेटब्रिटनची खालावत जाणारी आर्थिक परिस्थिति, अमेरिकेचें राजकीय स्वरूपाचें आर्थिक वर्चस्व ह्या सर्व गोष्टी आपण समुच्चयानें विचारांत घेतल्यास कॅनडासारख्या देशाशीं सलोख्याचे व्यापारी व औद्योगिक संबंध वाढविणें फायदेशीर ठरेल असें मानावयास बरीच जागा आहे. तरी पाकिस्तान व हिंदुस्थान ह्या स्वतंत्र सरकारांनीं व जबाबदार व्यापारी व कारखानदार वर्गानें या परिस्थितीचा शक्य तितका फायदा घ्यावा असें सुचवावेसें वाटतें. कॅनडांतील शेती पूर्णपणें यांत्रिक शक्तीवर चालते. कॅनडा जवळ सुवर्णसंचय आहे; व उद्योगधंद्यांत कॅनडानें विशेष प्रगति केली आहे. या अनुकूल परिस्थितीचा फायदा हिंदुस्थान व पाकिस्तान यांस घेतां येईल.

### डॉलर्सच्या दुष्काळाचा भ्रम—खरा प्रश्न आहे उत्पादन वाढीचा

ग्रेट ब्रिटन व इतर देश आपल्या दुःस्थितीचें कारण डॉलर्सचा तुटवडा हें असल्याचें सांगत आहेत. परंतु, डॉलर्सचा तुटवडा का पडला आहे, ही गोष्ट महत्त्वाची आहे. "न्यूजवीक"च्या ताज्या (ता. १८ ऑगस्टच्या) अंकांत डॉलर्सच्या दुष्काळाच्या भ्रमाचें निरसन खालीलप्रमाणें करण्यांत आलें आहे. "ब्रिटन, युरोप, मेक्सिको इत्यादि, स्वतः जितका माल अमेरिकेंत विकूं शकतात. त्यापेक्षा जास्त माल ते अमेरिकेंत खरेदी करूं इच्छित आहेत. आपल्या आवांक्याबाहेर त्यांना खरेदी करावयाची आहे. स्वतः ते उत्पादन करतात, त्यापेक्षा अधिकाचा उपभोग त्यांना हवा आहे. उत्पादन वाढविणें किंवा उठाव कमी करणें हाच त्यांच्या बिकट परिस्थितीवरील उपाय आहे. ह्यांपैकी कांहींच केलें नाहीं तर आमचें कर्ज घेऊन एकतर्फी व्यापारच फक्त ते चालू ठेऊं शकतील. थोडक्यांत म्हणजे, डॉलर्सचा तुटवडा पडलेला नसून, डॉलर्सच्या बदली देण्याला मालाचा पुरवठा इतर देशांचे जवळ नाहीं." १९४७ च्या पहिल्या सहामाहींत अमेरिकेनें केलेल्या निर्गतीचे व आयातीचे आंकडे पाहिले म्हणजे वरील विधानाची सत्यता पटेल. ह्या मुदतींत अमेरिकेनें ७५५ कोटि डॉलर्सचा माल परदेशीं पाठवला परंतु आयातीची किंमत मात्र फक्त २८६ कोटि डॉलर्सच भरली. म्हणजे, आयातीपेक्षा निर्गत ४६९ कोटि डॉलर्सनी ज्यास्त भरली. सबंद वर्षाचा हिशेब केला तर ही तफावत ९३८ कोटि डॉलर्सवर जाईल. तथापि, पहिल्या सहामाहीमधील निर्गतीपेक्षा दुसऱ्या सहामाहींतील निर्गत बरीच कमी भरेल, अशी अपेक्षा आहे. युरोपांतील देश अमेरिकेंतून महाग कोळसा विकत घेऊन आपली डॉलर्सची पुंजी संपवीत आहेत. जर्मनीमधील कोळशाचें उत्पादन वाढविण्याचें अगत्य अमेरिका प्रतिपादन करीत आहे त्याचें रहस्य वरील माहितीवरून समजेल.



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी









## मुंबई शेअर बाजार

( वि. स. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २६।८।४७ | बुधवार २७।८।४७ | गुरुवार २८।८।४७ | शुक्रवार २९।८।४७ | सोमवार १।९।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१७८; २१२७-८ | १००-१३-४ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | १९६० | १८९७—८ | १८९० | १८८० | १८४५ |
| ६३८; ४५७-८ | १९-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३८८—८ | ३७४—८ | ३७६ | ३७६ | ३६९ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २९—६ | २८-१० | २८-११ | २८—४ | २७—३ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३७—० | ३६—८ | ३६—३ | ३५-१४ | ३४—४ |
| — | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च—सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०५२—८ | १०३५ | १०४२—८ | १०१६—४ | १००६—४ |
| ११८०; ६५८ | ६-०-०† | मार्च—सप्टें. | कोहिनूर | १०० | ५७७ | ५७३ | ५७८ | ५६४ | ५५१ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५९८ | ५८८ | ५८० | ५६९ | ५६१ |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.—एप्रिल | नागपूर | १०० | ३०४—८ | ३०१ | ३०१ | २९७ | २९४ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३०१ | २९८ | २९८ | २९५ | २९१ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.—एप्रिल | गोकाक | १०० | ३१७ | ३१४ | ३१५ | ३११ | ३०४ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.—जुलै | सिंप्लेक्स | ५० | २३३ | २२९ | २३१ | २२६ | २२३ |
| ७४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४—२ | ४—२ | ४—१—६ | ४—१—६ | |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-१४ | १५-१० | १५-११ | १५—६ | १५—० |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्डस् | १ | २-१४ | ४-१४ | २-१२—६ | २-१३—६ | २-१३ |
| १०९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६१६—४ | ६१५ | ६१२—८ | ६०७—८ | ५८२—८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १६३ | १६०-१२ | १६१—८ | १६३ | १६३—८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७४ | २७० | २७१ | २७० | २६५ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४७८-१२ | ४७१—४ | ४७० | ४७० | ४५३-१२ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३१—९ | ३०-१४ | ३१-१४ | ३१-११ | ३१—० |

### दि पूना को. रुपी बँक लि., पुणें

( वार्षिक सभा : ७-९-४७ )

वरील बँकेचें वसूल भांडवल ४५,६०० रु. असून रिझर्व व इतर फंड २४½ हजारांचे आहेत. २ लक्ष, ३२ हजारांच्या तिचे-कडे ठेवी आहेत. वर्षअखेर बँकेस ४,५३४ रु निवळ नफा झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड देण्यास २,२८० रु. लागतील. श्री. द. ग. येरवडेकर एम. ए., एलएल. बी., हे सल्लागार मंडळाचे अध्यक्ष असून श्री. स.कृ. एकबोटे हे कार्यकारी मंडळाचे चेअरमन आहेत.

### रावेर पीपल्स को. बँक लि., रावेर

वरील बँकेचें वसूल भांडवल २५ हजार रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ९½ हजारांचे आहेत. ठेवींची रकम २½ लक्ष रु. आहे. वर्षअखेर बँकेस ४,०१८ रु. नफा झाला. त्यांतून भागीदारांस ६% डिव्हिडंड देण्यास १,५०० रु. लागतील.

### मध्यवर्ती सहकारी शालेय वस्तु भांडार लि., सांगली

१९४६-४७ मध्यें वरील भांडारानें १६,२९७ रुपयांचीं पुस्तकें विकी करून व २,२६७ रुपयांची स्टेशनरी विकून एकूण ५२६ रु. निव्वळ नफा मिळाला. भागीदारांस ६¼% डिव्हिडंड मिळालें.

### नगर डि. अर्बन सें. को. बँक लि., अहमदनगर

( वार्षिक सभा : १०-९-४७ )

बँकेच्या स्थापनेपासून झालेल्या खर्चात महागाईमुळें यंदा जास्तींत जास्त खर्च झाला आहे तरी सुद्धां जास्तींत जास्त नफाहि ह्यावर्षी झाला आहे. निवळ नफा ३१,९२६ रु. झाला. भागीदारांना ६¼% डिव्हिडंड देण्यासाठी ११,३०६ रु. लागतील. सेफ डिपॉझिट व्हॉल्टच्या कप्प्यासाठीं खूप मागणी आहे ती पुरी पाडण्यासाठी ५ कपाटें आणविलीं व आणखी २ कपाटें आणविण्यांत येत आहेत. बँकेचे माजी चेअरमन कै. रा. ब. ग. कृ. चितळे व ना. कुं. सो. फिरोदिया ह्यांच्या तैलचित्रांचा अनावरण समारंभ अहवालाचे वर्षी मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला.

**बँक ऑफ कोल्हापूर, लि.**—वरील बँकेनें ३० जून अखेरच्या सहामाहीकरितां खालीलप्रमाणें इंटेरिम डिव्हिडंड दिलें आहे:—

| ऑ. शेअर | इं. डिव्हिडंड | स्वातंत्र्यदिन बोनस | एकूण |
|---|---|---|---|
| (५० रु.):— | ३ रु. २ आ. | + १ रु. = | ४ रु. २ आ. |
| डिफर्ड शेअर | | | |
| (५० रु.):— | १५ रु. | + १ रु. = | १६ रु. |

**मिठाच्या तुटवड्याचा उतारूंच्या आगगाड्यांवर परिणाम**

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेच्या मीटर गेजवरील कांहीं गाड्या कांहीं काळ बंद ठेवण्यांत येतील. संयुक्त प्रांत व बिहार येथें मिठाचा तुटवडा पडला आहे. तिकडे मीठ पोंचविण्यासाठी डबे ओढण्याकरितां बंद केलेल्या गाड्यांचीं इंजनें उपयोगांत आणलीं जातील.

**दि प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया लि.**—वृत्त पुरविण्याचा धंदा करण्यासाठी वरील २५ लक्ष रुपयांची एक कंपनी नोंदविण्यांत आली आहे. फक्त वृत्तपत्रांनाच ह्या कंपनीचे शेअर्स घेतां येतील आणि कोणत्याहि सभासदास २५० पेक्षा ज्यास्त भाग मिळणार नाहींत. कंपनीच्या बोर्डावर प्रांतिक लहान वृत्तपत्रांनाहि प्रतिनिधित्व मिळेल.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★

९६ नारायण पेठ, पुणें २.

## विविध माहिती

**सुट्या भागांची बसेसना अडचण**—सुटे भाग मिळण्याच्या अडचणीमुळें लंडन शहरांतील ६,९०० बसेसपैकी १०० बसेस रोजच्या बसून आहेत.

**हिंदुस्थानसाठीं ऑस्ट्रेलिअन गहूं**—हिंदुस्थान सरकारतर्फे ऑस्ट्रेलिआकडे ७५,००० टन गहूं आणि कणिक ह्यांची मागणी करण्यांत आली होती. ही सामुग्री ऑस्ट्रेलिआकडून बहुधा सप्टेंबर महिन्यांत रवाना होईल. जानेवारी १९४७ पासून हिंदुस्थानांत परदेशांतून सुमारें १२,७५,००० टन अन्नधान्य आयात करण्यांत आले. त्यापैकीं ८ लाख टन गहू आणि कणीक, ३ लाख टन तांदूळ, आणि उरलेला मका होता.

**ऑस्ट्रेलिआंत ज्यूटची पैदास**—ऑस्ट्रेलिआंत ज्यूटची लागवड करणें शेतीच्या व व्यापाराच्या दृष्टीनें कितपत शक्य आहे तें पाहाण्यासाठी प्रयोग केले जाणार आहेत. बहुधा हे प्रयोग न्यू गिनी अगर ऑस्ट्रेलिआंत केले जातील. प्रयोग ऑस्ट्रेलिअन शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनसंस्थेमार्फत होतील. हिंदी ज्यूटच्या किंमतींत झपाट्यानें वाढ झाल्यामुळें आणि ज्यूटबद्दल दुसरें कांहीं साधन वापरण्यासारखें नसल्यामुळें ह्या प्रयोगाचा उपक्रम झाल्याचें समजतें.

**पासपोर्टासंबंधीं**—हिंदुस्थान व पाकिस्तान ह्या दोन्ही वसाहतींतून १५ ऑगस्टनंतर पूर्वीच्याच नमुन्याप्रमाणें परदेशांच्या प्रवासासाठी परवाना पत्रकें देण्यांत येणार आहेत. त्यापूर्वी दिले गेलेले परदेशीय प्रवासाचे परवाने दोन्हींपैकीं कोणत्याही सरकारकडून दिले गेले असें समजण्यांत यावयाचें आहे.


**हिंदुस्थानांतील ध्वनिक्षेपण**—हिंदुस्थानांत सध्यां ध्वनिक्षेपणाचा आणि त्यासाठीं लागणाऱ्या साधनांचा बराच फैलाव होत आहे. ब्रिटनकडून गेल्या वर्षी निरनिराळ्या ८० देशांना ध्वनिक्षेपक केंद्रांचीं साधनें पुरविण्यांत आलीं. त्या सर्व देशांपेक्षां गेल्या वर्षी हिंदुस्थाननें अधिक साधनें खरेदी केलीं. १९३८ सालीं ब्रिटननें रेडिओचीं २० लाख पौंडांचीं साधनें निर्यात केलीं. १९४६ सालीं ह्याच साधनांची निर्यात ८० लाख पौंडांची झाली.

**प. वर्क्स खात्याच्या कंत्राटपद्धतींत सुधारणा**—पब्लिक वर्क्स खात्याच्या कंत्राटांचें बाबतींतील तक्ते व पद्धती ह्यांत सुधारणा सुचविण्यासाठीं मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. सुपरिंटेंडेंट इंजिनिअर श्री. एन. पी. गुर्जर हे तिचे अध्यक्ष आहेत. श्री. एस. बी. जोशी हेहि एक सभासद आहेत.

**शिंद्या कंपनीचा पश्चिम गोलार्धांत प्रवेश**—शिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें हिंदुस्थान-अमेरिका मालाची वहातुक करण्यास प्रारंभ केला आहे. तूर्त पांच मालवाहू आगबोटी कंपनीनें त्यासाठीं खरीदल्या आहेत.


-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८


**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार





**साठे बिस्किटें**

**ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.**

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

**साठे बिस्किट कंपनी, पुणें २.**


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डी घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.